**अध्यक्ष महाराज,**

राज्यातले सध्याचे सरकार स्थापन होऊन सतरा महिने पूर्ण झाले आहेत. या काळातला विकासाची कास धरणारा दुसरा अर्थसंकल्प आज मी महाराष्ट्रातील ११ कोटी जनतेच्या साक्षीने सादर करीत आहे. मला आपल्याला सांगताना आनंद होतो की, आगामी वर्षाचे आर्थिक नियोजन तयार करताना या सरकारने समाजातल्या शेवटच्या माणसाच्या विकासाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. ज्याच्या घामाच्या सुगंधाने भूमाता प्रसन्न होते आणि हिरवाईचे ताटवे फुलून येतात, तो शेतकरी हा या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू आहे. शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार आणि त्याला पूरक असा ग्रामविकास हा देखील या अर्थसंकल्पाचा मुख्य आधार आहे. स्वातंत्र्याच्या सात दशकात विकासाची सोनेरी किरणे ज्यांच्या दारात पोहोचलेली नाहीत, त्या सर्व दीन, दुर्बल, शोषित, पिडीत, अंध, अपंग, निराधार, विधवा, परित्यक्ता, दलित, आदिवासी, असहाय्य बांधवांच्या विकासाचा निर्धार मी आज या अर्थसंकल्पातून व्यक्त करणार आहे.

वर्षानुवर्षे या देशात अर्थसंकल्प मांडले गेले आहेत. राजकारणात आणि समाजकारणात वावरताना इथल्या सामान्य माणसाशी माझे जे नाते जोडले गेले आहे, त्या आधारे मी हे विश्वासाने सांगू शकतो की, सामान्य माणूस अर्थसंकल्प कदाचित वाचत नसला तरी, तो या अर्थसंकल्पात स्वत:ला शोधत असतो. मला येथे हे आवर्जून सांगितले पाहिजे की, हा अर्थसंकल्प मी मांडत असलो तरी, त्यातील भावना, अपेक्षा या राज्यातल्या काना-कोपऱ्यात वसलेल्या सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत.

या राज्यातल्या रस्ते, पाणी, वीज, सिंचनव्यवस्था व अन्य पायाभूत सुविधांचा विकास तर आम्हाला करायचा आहेच, पण त्यासोबतच आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वप्नातला पराक्रमी, सुजलाम्, सुफलाम् महाराष्ट्र घडवायचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बघितलेले सामाजिक न्यायाचे स्वप्न पूर्ण करायचे आहे. आम्हाला पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या अंत्योदयाच्या स्वप्नांची पूर्ती करताना शेवटच्या माणसाच्या वेदनेची जाणीव मनात जपायची आहे, सावित्रीच्या मुलींचा सत्व

आणि स्वाभिमान जागृत करायचा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज यांच्या कल्पनेतील बंधूभावाशी समर्पित असा समाजही आम्हाला निर्माण करायचा आहे. आज मी सादर करीत असलेल्या अर्थसंकल्पातील एकेका पैशाचे नियोजन या सर्व महान व्यक्तींच्या स्वप्नपूर्तीसाठीच असेल, असा विश्वास मी राज्यातील जनतेला देत आहे.

राज्यातील शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सक्षम शेतकरी व समृद्ध ग्रामीण क्षेत्र हाच " मेक इन इंडियाचा " पाया आहे. शेतकरी जगला तरच राज्याची अर्थव्यवस्था सक्षम होऊ शकेल. या सर्व बाबी विचारात घेऊन कृषी क्षेत्राला भरीव तरतूद उपलब्ध करुन, विशेष चालना देण्याच्या दृष्टीकोनातून हा अर्थसंकल्प मांडण्याचा माझा प्रयत्न आहे. म्हणून, हा अर्थसंकल्प जगाचा पोशिंदा शेतकरीराजासाठी समर्पित असून आर्थिक वर्ष २०१६-१७ " शेतकरी स्वाभिमान वर्ष " म्हणून साजरे करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

निराधार भगिनींना आधार देणे ही सरकारची प्राथमिकता आहे. स्त्री हा आमच्या समाजाचा मानबिंदू आहे. तीच जर परिस्थितीच्या रेट्यात होरपळत असेल तर, आमच्या प्रगतीला कोणताही नैतिक आधार उरणार नाही. स्त्रीच्या जीवनमानावर समाजाचा दर्जा ठरत असतो म्हणून शेतकरी, ग्रामविकास यासोबतच निराधार, विधवा,परित्यक्ता, घटस्फोटीता यांचे जीवनमान उंचावणे हा देखील या अर्थसंकल्पातून साधावयाच्या सर्वांगिण विकासाच्या प्रयत्नातील मुख्य मूलाधार आहे.

**दुष्काळ निवारण**

१. निसर्गाच्या लहरीपणामुळे गेली तीन वर्षे हे राज्य अभूतपूर्व अशा अवर्षणाचा सामना करीत आहे. अशा वेळी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीला धावून जाण्याची भूमिका सरकारने स्वीकारली आहे. मी अगोदरच सांगितले आहे की, हा अर्थसंकल्प माझ्या बळीराजाला समर्पित आहे आणि त्यासाठी कृषी क्षेत्र आणि शेतकरी यांच्या विविध योजनांसाठी शासनाने सुमारे २५,००० कोटी रुपये एवढी भरीव तरतूद केलेली आहे. त्याचे तपशील माझ्या भाषणात पुढे येत राहतील.

२. शेतकऱ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने शासनाने सन २०१५-१६ मध्ये दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना द्यावयाच्या प्रती हेक्टर मदतीत लक्षणीय वाढ करुन एकूण ५ हजार २ कोटी ८२ लाख रुपये इतका निधी

उपलब्ध करुन दिलेला आहे. खबरदारीची उपाययोजना म्हणून यासाठी मी सन २०१६-१७ करिता ३ हजार ३६० कोटी ३५ लाख रुपये इतका नियतव्यय उपलब्ध करुन देत आहे.

३. सन २०१५-१६ या वर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीक विमा योजनेत सहभाग घेतला आहे. खरीप २०१५ या हंगामात झालेल्या नुकसानापोटी शेतकऱ्यांना विमा भरपाई म्हणून केंद्र शासनाकडून अंदाजे ४ हजार २०० कोटी रुपये प्राप्त होतील. पीक विमा योजनेमध्ये राज्य शासनाचा हिस्सा म्हणून २०१६-१७ या वर्षी मी १ हजार ८५५ कोटी रुपये एवढी तरतूद उपलब्ध करुन देत आहे.

४. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत केल्याचे केवळ समाधान मानून चालणार नाही. निसर्गाचा कितीही कोप झाला तरी शेतकरी स्वबळावर उभा राहू शकला पाहिजे. त्या संकटाचा सामना करण्याचे बळ त्याला एकवटता आले पाहिजे. यासाठी स्थायी व्यवस्थांची उभारणी आवश्यक आहे. चालू वर्षी राज्यात जलयुक्त शिवार कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्यासाठी तब्बल १ हजार ६०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला. या माध्यमातून ५ हजार गावात १ लाख ३० हजार जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०१६-१७ या वर्षीसुध्दा या योजनेसाठी मी १ हजार कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध करुन देत आहे.

५. सन २०१५च्या हिवाळी अधिवेशनात “ मागेल त्याला शेततळे ” ही योजना मंजूर करण्यात आली होती. शेततळी, विहिरी व विद्युतपंप जोडणी या माध्यमातून टंचाईच्या काळातसुध्दा पाणी उपलब्ध व्हावे आणि पीक वाचविण्यास शेतकऱ्यांना मदत व्हावी, यादृष्टीने या सर्व कार्यक्रमासाठी एकूण २ हजार कोटी रुपये उपलब्ध करीत आहे. या माध्यमातून १ लाख शेततळी, ३७ हजार ५०० विहिरी व ९० हजार विद्युतपंप जोडण्या उपलब्ध करुन दिल्या जातील. यासाठी सुमारे ५० हजार शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले असून, या शेतकऱ्यांना दुष्काळाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी यामुळे मोठी मदत होईल अशी मला खात्री आहे. हा खर्च प्रभावी व पारदर्शक व्हावा यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सूक्ष्म नियंत्रण ठेवले जाईल.

६. औरंगाबाद, नागपूर व अमरावती विभागामधील १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना आधारभूत किंमत योजनेच्या दराने धान्य खरेदी करून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी १ हजार ३५ कोटी ८३ लाख रुपये खर्च होणार आहे. याचा लाभ ६८ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे.

७. पूर्व विदर्भातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या नक्षलग्रस्त जिल्ह्यातील तसेच नागपूर जिल्ह्यातील ६ हजार ८६२ माजी मालगुजारी तलावांची मत्स्यसंवर्धन खड्डयांसह दुरुस्ती व नुतनीकरणाचे नियोजन आहे. त्यासाठी सन २०१६-१७ करिता १५० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. यामुळे शेतकरी व मासेमारी करणाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

८. शेतकऱ्यांच्या शेतातील उत्पादनांची वाहतूक सुरळीत होण्यासाठी पांधण रस्ता हा अत्यंत महत्वाचा असतो. अशा रस्त्यांची दुरुस्ती हा शेतकऱ्यासाठी वर्षानुवर्षे जिव्हाळ्याचा विषय राहिलेला आहे. त्यामुळे अशा पांधण रस्त्यांच्या दुरुस्तीचा विषय शासनाने विचारात घेतला आहे. त्यासाठी मी " पालकमंत्री पांधण रस्ते योजना " घोषित करीत आहे. या रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम प्रामुख्याने ग्रामीण भागातील तरुणांनाच मिळावे असा आमचा प्रयत्न आहे. जलयुक्त शिवार योजनेतील कामे व पांधण रस्त्यांची कामे करण्यासाठी ग्रामीण युवकांकरिता मी " पालकमंत्री अर्थ मुव्हींग मशिन्स खरेदी योजना " प्रस्तावित करीत असून ग्रामीण युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना या मशिन्स खरेदी करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यावरील व्याजाचे दायित्व राज्य शासनातर्फे स्वीकारले जाईल. पांधण रस्ते दुरुस्ती व व्याजाचे दायित्व यासाठी १०० कोटी रुपये एवढा नियतव्यय मी प्रस्तावित करीत आहे.

कृषी

९. शेतकऱ्यांच्या अंगणात ज्ञानाची गंगा आणणारे भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने राबविल्या जाणाऱ्या व्याज सवलत योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पीककर्ज उपलब्ध होत आहे. १ लाख रुपयापर्यंतच्या पीककर्जासाठी वार्षिक तीन टक्के दराने तसेच रु. १ लाख ते ३ लाखापर्यंतच्या पीक कर्जासाठी वार्षिक एक टक्का दराने व्याज सवलत देण्यात येत आहे. या योजनेसाठी सन २०१६-१७ करीता ११० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

१०. संयुक्त राष्ट्र संघटनेने सन २०१६ हे " आंतरराष्ट्रीय कडधान्य वर्ष " घोषित केले आहे. सन २०१६-१७ मध्ये कडधान्याची उत्पादकता वाढविण्याच्या विविध कार्यक्रमांसाठी त्याचप्रमाणे राज्यातील तेलबीया पिकांच्या उत्पादकतेत वाढ व्हावी याकरिता राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या माध्यमातून ८० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

११. बहुतांश कृषी उत्पादने नाशवंत स्वरुपाची असतात. त्यामुळे कृषीमालावर काढणीनंतर लवकरात लवकर प्रक्रिया करणे आवश्यक असते म्हणून, कृषी क्षेत्रात कृषी प्रक्रिया उद्योगाचे महत्व अनन्यसाधारण आहे. हे महत्व लक्षात घेता कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यासाठी कृषी प्रक्रिया उद्योग उभारणाऱ्या व्यक्तीला प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा जास्तीतजास्त ५० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्याची नवीन योजना प्रस्तावित करीत आहे. यासाठी सन २०१६-१७ मध्ये ५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित असून, या योजनेच्या प्रतिसादावर भविष्यात अजून अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे.

१२. कृषी क्षेत्रातील विविध उपक्रम, घडामोडी, संशोधन व समुपदेशन इत्यादी बाबी एकाच ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात याकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून " पंडित दिनदयाळ उपाध्याय कृषी मार्गदर्शक योजना " सुरु करण्याचा मानस आहे. यासाठी सन २०१६-१७ मध्ये ६० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

१३. कृषी शिक्षण व संशोधनाला चालना देण्यासाठी विदर्भात बुलढाणा येथे शासकीय कृषी महाविद्यालय, अहमदनगर जिल्ह्यातील अवर्षणग्रस्त भागात हाळगाव, तालुका जामखेड येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय कृषी महाविद्यालय तसेच उद्यानविद्या शाखेला चालना देण्यासाठी जळगाव जिल्ह्यातील पाल येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात कार्यान्वित करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी सन २०१६-१७ मध्ये आवश्यक नियतव्यय उपलब्ध करुन दिला जाईल.

१४.  पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक गरज विचारात घेऊन नाशिक विभागात जळगाव येथे तर अमरावती विभागात अकोला येथे प्रत्येकी एक याप्रमाणे २ नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१६-१७ करिता १० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

१५.  महाराष्ट्रात आजपर्यंत आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित शेतकऱ्यांची संख्या १ हजार ६६४ इतकी आहे. हा पुरस्कार त्यांच्या शेती क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाच्या बहुमोल योगदानाबद्दल आहे. अशा ज्ञानी शेतकऱ्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ इतरही शेतकरी बांधवांना मिळावा यासाठी " कृषी गुरुकुल " ही नवीन योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक जिल्ह्यातील ३ आदर्श शेतकऱ्यांची निवड करुन त्यांच्याकरवी २५ अन्य शेतकऱ्यांना अद्ययावत शेतीतंत्राचे मार्गदर्शन करण्यात येईल. मार्गदर्शक व प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना मानधन देण्याचे प्रस्तावित असून यासाठी आवश्यक नियतव्यय प्रस्तावित आहे.

१६.  कोणत्याही क्षेत्रातील महोत्सव हा त्या क्षेत्रातील वैभवाचा पाया असतो. कृषी क्षेत्रात हे राज्य वैभवसंपन्न करण्याच्या उद्देशाने यापुढे दरवर्षी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात " कृषी महोत्सव " आयोजित करण्यात येईल. या महोत्सवात शेतकऱ्यांच्या विचारांची देवाणघेवाण, विविध कृषी विषयक योजनांची माहिती, मान्यवर तज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने, कृषी प्रदर्शने इत्यादी बाबींचा समावेश असेल. या महोत्सवात शेती क्षेत्रात अभिनव उपक्रम राबविणाऱ्या शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येईल. सदर महोत्सवाकरिता प्रती जिल्हा २० लाख रुपये याप्रमाणे एकूण ३४ जिल्ह्यांकरिता ६ कोटी ८० लाख रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

१७.  सेंद्रीय शेतीला चालना देणे ही काळाची गरज आहे. यासाठी राज्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी या चारही कृषी विद्यापीठात स्वतंत्र " सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र " स्थापन करण्यात येईल.

१८.  ग्रामीण भागात आवश्यकतेनुसार रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना व राज्य रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. केंद्र शासनाकडून या योजनांसाठी सन २०१६-१७ करिता

२ हजार ७६८ कोटी ६७ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच राज्य हिस्सा म्हणून ७०५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. अशा प्रकारे या योजनांसाठी एकूण ३ हजार ४७३ कोटी ६७ लाख रुपये इतका भरीव नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

१९. राज्यातील सर्व २ हजार ६५ महसूल मंडळस्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रे स्थापन करण्याचा शासनाचा मानस असून, ही केंद्रे हवामानविषयक मध्यवर्ती माहिती केंद्राशी जोडली जातील. त्याद्वारे ४ विशिष्ट प्रकारची माहिती जसे पाऊस, वाऱ्याचा वेग, आर्द्रता व तापमान यांची माहिती संकलित केली जाणार आहे. त्यामुळे हवामानाचा अचूक अंदाज येऊन शेतकऱ्यांना सुयोग्य मार्गदर्शन करणे शक्य होणार आहे. तसेच शेतकऱ्यांकरिता नाविन्यपूर्ण पीक विमा योजना आखण्यातही याची मदत होणार आहे. याकरिता सुमारे १०७ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**पशुसंवर्धन**

२०. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पीपीपी-आयएडी खाजगी सहभागातून एकात्मिक कृषी विकास कार्यक्रमात नाबार्डच्या सहाय्याने दुग्धव्यवसाय प्रकल्प उभारण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी शेतकऱ्यांची उत्पादक कंपनी स्थापन करुन १०० कोटी रुपये किंमतीचे प्रकल्प विदर्भ व मराठवाड्यात उभारण्यात येतील.

२१. शेतकरी व शेतमजुरांना कुक्कूटपालन, पक्षीपालन असे जोडधंदे उपलब्ध करुन देण्यासाठी २०१६-१७ करिता ५१ कोटी १३ लाख रुपये इतकी तरतूद प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे आतापर्यंत राज्यातील ३४ जिल्ह्यांपैकी १६ जिल्ह्यात सघन कुक्कूट विकास गटाची स्थापना करण्यात आली आहे. सन २०१६-१७ मध्ये आणखी १४ जिल्ह्यात सघन कुक्कूट विकास गटाची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे.

२२. स्थानिक देशी जातीच्या गायी व म्हशींचे संवर्धन व संगोपन करण्यासाठी राज्यात हेटीकुंटी, जि. वर्धा आणि बोड, जि. अमरावती या दोन ठिकाणी वळूमाता संगोपन केंद्रांचे नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्याची योजना असून त्यासाठी सन २०१६-१७ करिता १८ कोटी ६१ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

२३. महाराष्ट्रातील ३४ ग्रामीण जिल्ह्यांमध्ये भाकड गाई व गोवंश संगोपनासाठी मी " गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र " ही नवीन योजना जाहीर करत असून, या क्षेत्रात अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थांमार्फत ही योजना राबविली जाईल. यासाठी अशा संस्थांना एकरकमी १ कोटी रुपये अनुदान देण्यात येईल. तसेच त्याठिकाणी उपलब्ध असल्यास आवश्यकतेनुसार शासकीय जमीन देण्यात येईल. या गोवर्धन गोवंश रक्षा केंद्रांसाठी सन २०१६-१७ करिता ३४ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

२४. सागरी किनारा लाभलेल्या ५ जिल्ह्यांमध्ये विविध ठिकाणी जेट्टी उभारण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये याकरिता ३० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. महाराष्ट्र राज्यातील मत्स्यव्यवसायासाठी ससून गोदी हे महत्वाचे बंदर असून या बंदराचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. याकरिता ५२ कोटी १७ लाख रुपये खर्च येणार असून, त्यापैकी ४० टक्के निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होणार आहे. या योजनेसाठी सन २०१६-१७ करिता १५ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

सिंचन

२५. सन २०१५-१६ मध्ये मी सिंचनासाठी ७ हजार २७२ कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले होते. आज मला हे सांगताना आश्वासनपूर्तीचा आनंद होत आहे की, ही तरतूद पूर्णपणे वितरित करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना जलसिंचनाचा त्वरित लाभ मिळेल अशा प्रकल्पांवर विनियोग करण्याकरिता अग्रक्रम देण्यात आलेला आहे. सन २०१६-१७ करिता एकूण ७ हजार ८५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे येत्या वर्षी २८ प्रकल्प पूर्ण होवून ७७० दशलक्ष घनमीटर एवढा अतिरिक्त पाणी साठा निर्माण होईल व १ लाख ६८ हजार हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल. यापैकी वाघूर, बावनथडी, लोअर दुधना, तिल्लारी, लोअर वर्धा, लोअर पांझरा आणि नांदूर मध्यमेश्वर टप्पा-२ या ७ प्रकल्पांचा " प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेमध्ये " समावेश झाला आहे. या प्रकल्पांसाठी सन २०१५-१६ मध्ये ९३८ कोटी रुपये तरतूद उपलब्ध करण्यात आली होती. आता सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात २ हजार ७८ कोटी रुपये इतका भरीव नियतव्यय प्रस्तावित आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यावर सुमारे १ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. निर्माण होणाऱ्या सिंचन क्षमतेचे गट नंबरनिहाय सूक्ष्म नियोजन करुन हा खर्च अत्यंत परिणामकारक करण्यात येईल.

२६. भविष्यात पाण्याच्या प्रत्येक थेंबाच्या वापराचे काटेकोर नियोजन करण्याची व समाजातील सर्व स्तरांमध्ये जलसाक्षरता व जलजागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने राज्यात यशदा, पुणे या संस्थेमध्ये एक कायम स्वरुपी केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. तसेच वन अकादमी चंद्रपूर, वाल्मी औरंगाबाद आणि डॉ. पंजाबराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण प्रबोधिनी अमरावती या ठिकाणी उपकेंद्रे निर्माण करण्याचे नियोजन आहे. या केंद्रांमधून जलसाक्षरता व जलजागृती विषयक उपक्रम व प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने घेण्यात येतील.

**ग्राम विकास**

२७. राज्यातील रस्त्यांनी न जोडलेल्या वाड्या-वस्त्या जोडण्यासाठी नवीन जोडणी व प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेत अंतर्भूत न झालेल्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर राज्यात “ मुख्यमंत्री ग्राम सडक योजना ” ही योजना शासनाने हाती घेतली आहे. सुमारे १ हजार कोटी रुपयांची कामे लवकरच सुरु करण्यात येत आहेत. या योजनेसाठी २०१६-१७ मध्ये ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

२८. राज्यातील गावांचा शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी “ स्मार्ट गाव योजना ” प्रस्तावित करण्यात येत आहे. या योजनेमध्ये पंचायत समिती गणस्तरावर ग्रामपंचायतीमध्ये स्पर्धा होईल व त्यामध्ये तालुका तसेच जिल्हा स्तरावर स्मार्ट ग्रामपंचायतींची निवड करण्यात येईल. या योजनेअंतर्गत गण, तालुका व जिल्हास्तरावर निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना विकास कामासांठी प्रोत्साहनपर निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे.

२९. शासन स्तरावर घेण्यात येत असलेले निर्णय राज्यातील सर्व ग्राम पंचायतींना लवकरात लवकर कळावेत व त्या निर्णयांची माहिती ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेला व्हावी यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये “ डिजीटल बोर्ड ” बसवण्याचा शासनाचा मानस असून यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

३०. ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्यासाठी सुरु असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमासाठी राज्य हिश्श्याचा सन २०१६-१७ मध्ये १७० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

३१. राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील पाण्याची समस्या सोडविण्याच्या उद्देशाने "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" या नावाने ग्रामीण पाणी पुरवठ्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम शासन हाती घेत आहे. आगामी काळात या कार्यक्रमावर सुमारे २ हजार ५०० कोटी खर्च प्रस्तावित आहे. या योजनेत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमात समाविष्ट नसणाऱ्या योजना तसेच बंद असलेल्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन व देखभाल या बाबी समाविष्ट आहेत. यासाठी सन २०१६-१७ मध्ये ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

३२. राज्यातील ग्रामीण भागाचा विकास जलदगतीने होण्यासाठी ग्रामपंचायती अधिक सक्षम होणे आवश्यक आहे. यादृष्टीने "बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियान" ही नवीन राज्यस्तरीय योजना प्रस्तावित आहे. यामध्ये नवीन ग्रामपंचायतीचे बांधकाम, ग्रामपंचायतींना पुरेसे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करणे, जिल्हा परिषद प्रभाग बळकट करणे, तसेच ग्राम पंचायतींच्या आर्थिक व भौतिक नियोजनात महिलांच्या लोकसंस्थांचा सहभाग वाढविणे व त्याकरिता प्रशिक्षण आयोजित करणे या बाबींचा समावेश राहील. यासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरिता १ कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध केला आहे.

३३. महिला स्वयंसहाय्यता समुहांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करण्याकरिता "सुमतीताई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण" ही नवीन योजना मी घोषित करीत असून, या योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षाकरीता १० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करण्यात येईल.

**वीज निर्मिती व वीज दर**

३४. राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या वीजेसंदर्भात अधिक गुंतवणूक करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महानिर्मितीची सध्याची स्थापित क्षमता १२ हजार ७७ मे.वॅ. इतकी असून त्यापैकी औष्णिक ८ हजार ६४० मे.वॅ., जलविद्युत २ हजार ५८५ मे.वॅ., गॅस वर आधारित ६७२ मे.वॅ., तर सौर ऊर्जा निर्मिती १८० मे.वॅ. इतकी आहे. वीज निर्मितीसाठी सन २०१६-१७ या वर्षाकरिता एकूण ७८४ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

३५. अस्तित्वात असलेली वीज वितरण प्रणाली सुधारण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील १२० विभागांसाठी " पायाभूत आराखडा योजना " प्रस्तावित आहे. या योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये १ हजार ५०० कोटी रुपये महावितरण खर्च करणार असून त्यामधून २४० नवीन उपकेंद्राची उभारणी प्रस्तावित आहे. या खर्चाच्या २० टक्के भागभांडवलासाठी ३०१ कोटी रुपये २०१६-१७ या वर्षाकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

३६. शासनाने नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांद्वारे वीज निर्मिती करण्यावर भर दिलेला आहे. या स्त्रोतांच्या क्षमतेमध्ये भरीव वाढ करण्यासाठी नवीन धोरण जाहीर केले आहे. या योजनांसाठी सन २०१६-१७ करिता ४५६ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

३७. कृषी ग्राहक, यंत्रमाग ग्राहक, औद्योगिक व वाणिज्यिक ग्राहकांना वीज दरात सवलत या योजनेसाठी सन २०१६-१७ मध्ये ४ हजार ४६२ कोटी ६९ लाख रुपये इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

३८. विदर्भ नैसर्गिक व खनिज स्त्रोतांनी समृद्ध असूनही औद्योगिक क्षेत्रात मात्र राज्याच्या उर्वरित विभागांच्या तुलनेत मागे आहे. तसेच मराठवाडा विभागातही याबाबतीत म्हणावी तशी प्रगती झालेली नाही. या दोन्ही विभागात अधिकाधिक नवीन उद्योग यावेत व औद्योगिक वीज वापर वाढावा याकरिता औद्योगिक घटकांस सर्वसाधारण व प्रोत्साहनात्मक बाबींवर वीज दरात सवलत देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याकरिता सुमारे १ हजार कोटी रुपये तरतूद करण्याचे प्रस्तावित आहे.

**उद्योग व कौशल्य विकास**

३९. उद्योग क्षेत्रात नवी झेप घेण्यासाठी राज्य सरकारने पाऊले उचलली आहेत. त्यासाठी वेगवेगळे उपाय देखील योजले जात आहेत. परवान्यांची सुलभता वृद्धिंगत करण्यासाठी एक खिडकी योजना, इलेक्ट्रॉनिक धोरण, किरकोळ व्यापार धोरण, माहिती तंत्रज्ञानांवर आधारित उद्योगाचे धोरण नुकतेच जाहीर झाले आहे. जानेवारी २०१६ पर्यंत ८ हजार ४९७ प्रकल्पांनी उत्पादन सुरु केले असून, याद्वारे रुपये २ लाख ६२ हजार ६३१ कोटी गुंतवणूक व ११ लाख २३ हजार थेट रोजगार निर्मिती झाली आहे. विशाल प्रकल्प धोरण जाहीर झाल्यापासून १३९ विशाल प्रकल्पांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पात्रता प्रमाणपत्रे मंजूर केली आहेत. यामधून ५३ हजार ३३० कोटी २५ लाख रुपये प्रत्यक्ष गुंतवणूक व ८५ हजार ८४ प्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली आहे. उद्योग क्षेत्राला दिल्या जाणाऱ्या सवलतींसाठी २ हजार ६५० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे.

४०. डिएमआयसी दिल्ली- मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडोर या योजनेंतर्गत औरंगाबाद इंडस्ट्रीयल टाऊनशिप लिमिटेड ही विशेष हेतू कंपनी स्थापन झाली असून शेंद्रा येथील ८३९ हेक्टरवर पायाभूत सुविधांची कामे सुरु झाली आहेत. केंद्र शासनाने या विशेष हेतू कंपनीकडे ६०० कोटी रुपयांचे भागभांडवल वर्ग केले आहे.

४१. उद्योगवाढीसाठी प्रयत्नशील असलेले आमचे सरकार इथल्या कामगारांच्या पाठीशीही तेवढ्याच भक्कमपणे उभे राहिले आहे. या राज्यात मोठ्या प्रमाणात असलेल्या असंघटित कामगारांकरिता " एकात्मिक व्यवस्थापन प्रणाली " विकसित केली जात आहे. सदर योजनेसाठी सन २०१६-१७ मध्ये १८ कोटी ९२ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

४२. माननीय पंतप्रधान देशविदेशातील त्यांच्या सभांमधून या देशातील तरुणाईचा गौरव करतात. ही तरुणाई आमची उद्याची उज्ज्वल शक्ती आहे. ज्या शक्तीच्या बळावर आम्ही महासत्तेची स्वप्न बघतो अशा तरुणाईला रोजगार व त्याअनुषंगाने आत्मविश्वास देण्यासाठी केंद्र शासनाने " मुद्रा बँक योजना " सुरु केली आहे. या योजनेमार्फत बेरोजगारांना कर्ज पुरवठा करुन त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहित केले जाते. मुद्रा बँक योजनेचा लाभ राज्यातील जास्तीत जास्त तरुणांना मिळावा यासाठी या योजनेचा प्रचार, प्रसार व समन्वय करण्याकरिता जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून युवकांना मार्गदर्शन करुन बँकांशी समन्वय साधण्यात येईल. त्यासाठी सन २०१६-१७ मध्ये २० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

४३. महाराष्ट्रात उद्योगांना अधिक चालना देण्यासाठी " महाराष्ट्र उद्योजकता परिषदेची " स्थापना करण्याचा मानस आहे. त्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**वस्त्रोद्योग व पणन**

४४. वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी राज्य शासनामार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. कापूस उत्पादक भागामध्ये वस्त्रोद्योग घटक यावेत याकडे शासनाचे विशेष लक्ष आहे. सध्या कार्यान्वित असलेली केंद्र पुरस्कृत वस्त्रोद्योग संकुल योजना उभारणे तसेच मराठवाडा विदर्भ व उत्तर महाराष्ट्रमधील नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांस भांडवली अर्थ सहाय्य, नवीन वस्त्रोद्योग प्रकल्पांसाठी दीर्घ मुदतीच्या कर्जावर व्याज अर्थसहाय्य इत्यादि योजनांकरिता सन २०१६-१७ मध्ये २६५ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**पायाभूत सुविधा व रस्ते विकास**

४५. पायाभूत सुविधांची उभारणी हा कुठल्याही राज्याच्या विकासाच्या टप्प्यातील एक महत्वपूर्ण बिंदू असतो. या सुविधांच्या उभारणीचे आव्हान आमच्या सरकारने स्वीकारले आहे. रस्ते बांधणीचे क्षेत्रासाठी शासनाने एकूण ४ हजार ५० कोटी रुपये एवढा नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे. शासनाने कल्याण शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी " भिवंडी-कल्याण-शिळफाटा " असा २१ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग बांधण्याचे ठरविले आहे. त्यासाठी यावर्षी ४० कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित आहे. खाजगीकरण तसेच शासन सहभागातून या योजनेंतर्गत रस्त्यांचे दुपदरीकरण व चौपदरीकरण करण्यासाठी " बांधा-वापरा-हस्तांतरित करा " हे धोरण अवलंबिले असून, या योजनेकरिता सन २०१६-१७ मध्ये ५५० कोटी रुपये शासन सहभागाकरिता तरतूद प्रस्तावित आहे. तसेच राज्यातील ४० हजार किलोमीटर राज्यमार्ग व ५० हजार किलोमीटर प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यापैकी २१ हजार किलोमीटरचे रस्ते हायब्रीड ॲन्युइटी अंतर्गत पुढील ८ वर्षात टप्प्याटप्प्याने सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

४६. केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत केंद्र शासनाने मागील १० वर्षात राज्यात २ हजार ५०० कोटी रुपयांची कामे मंजूर केली होती. मात्र सत्तांतरानंतर केंद्र शासनाने सन २०१४-१५ मध्ये १ हजार ७१८ कोटी रुपये व सन २०१५-१६ मध्ये २ हजार ९४७ कोटी रुपये अशी एकूण ४ हजार ६६५ कोटी रुपयांची नवीन कामे मंजूर केली आहेत. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्यातील कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करुन ३ हजार ९२४ किलोमीटर लांबीचे रस्ते नव्याने राष्ट्रीय महामार्गात रूपांतरित करण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यातील रस्ते विकासासाठी केंद्र शासनाने केलेल्या भरीव मदतीसाठी मी केंद्र शासनाचा आभारी आहे.

४७. आपल्या राज्यात सुमारे ४० हजार किलोमीटर लांबीचे राज्य महामार्ग आहेत. राज्य महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या महिलांना स्वच्छतागृहाच्या सोई उपलब्ध व्हाव्यात म्हणून, आगामी काळात दर १०० किलोमीटर अंतरावर १ अशा प्रमाणात अद्ययावत अशी ४०० स्वच्छतागृहे बांधण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी यावर्षी ५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करण्यात येत आहे.

४८. मिहान प्रकल्पातील भूसंपादन व प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, उर्वरित भूसंपादन, सानुग्रह अनुदान वाटप तसेच विशेष बाब सानुग्रह अनुदान प्रस्ताव इत्यादी करिता सदर प्रकल्पास १ हजार ५०८ कोटी ३६ लाख रुपये किंमतीस सुधारित प्रशासकीय मान्यता आहे. याकरिता सन २०१६-१७ करिता २१६ कोटी ३३ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

४९. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारीतील शिर्डी, कराड, अमरावती, अकोला, सोलापूर, चंद्रपूर इत्यादि विमानतळांचा विकास व तेथील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन यासाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी ६० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

५०. राज्यातील प्रलंबित रेल्वे प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी रेल्वे मंत्रालयासोबत विशेष उपयोजिता वाहन स्थापन करण्याचा सामंजस्य करार झालेला आहे. राज्यातील ९ रेल्वे प्रकल्प महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत सुविधा कंपनीद्वारे राबविण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. राज्यातील रेल्वे प्रकल्पातील राज्य शासनाच्या सहभागापोटी ६८ कोटी ६० लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

निवारा

५१. निराधारांना आधार, गरजवंतांना मदतीचा हात, बेघरांना घरे हे या सरकारचे स्वप्न आहे. त्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यास सरकार कटिबद्ध आहे. आसरा नसलेल्या प्रत्येकाला त्याच्या हक्काचे घर मिळावे यासाठी " सर्वांसाठी घरे-२०२२ " या केंद्र पुरस्कृत योजनेची अंमलबजावणी काही सुधारणांसह राज्यात करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच व्याज अनुदान योजना बँकांमार्फत संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे. सन २०१६-१७ मध्ये यासाठी राज्याचा सहभाग म्हणून ७०० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

५२. नवीन चंद्रपूर येथील अधिसूचित विभागामध्ये विकासाची कामे करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून म्हाडाची नेमणूक करण्यात आली असून या शहराचा विकास जलद गतीने करण्याचा शासनाचा प्रयत्न राहिल. या योजनेसाठी सन २०१६-१७ करिता १०० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

५३. या देशातील स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या घरादाराची पर्वा न करता स्वातंत्र्य आंदोलनात झोकून दिले. त्यांचे हे योगदान अनन्यसाधारण आहे. त्याची कृतज्ञता आमच्या मनात आहेच. पण स्वातंत्र्याच्या ६८ वर्षानंतरही काही स्वातंत्र्य सैनिकांना आजही स्वत:चे हक्काचे घर नाही. याची खंत माझ्या मनात कायम होती. स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांच्या हयात पत्नीला अजूनही स्वत:चे घर नाही अथवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या नावे घर नाही, अशा स्वातंत्र्य सैनिकाला किंवा त्यांच्या हयात पत्नीला त्यांच्या राहत्या गावात घर घेण्यासाठी १० लाख रुपयांच्या मर्यादेत अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याचे मी प्रस्तावित करीत आहे.

**नागरीकरण**

५४. महाराष्ट्र राज्यातील सर्व नगरपरिषदा, नगरपंचायती व ड वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रात नागरी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राबवण्यात येत आहे. यासाठी सन २०१६-१७ मध्ये १ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

५५. नागपूर व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या कामास विशेष गती देण्यासाठी या प्रकल्पांना सन २०१६-१७ मध्ये एकूण १८० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

५६. नरिमन पॉईंट व वांद्रे-कुर्ला संकुल यासारख्या वाणिज्य केंद्रांसमवेत आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय विमानतळांना तसेच, औद्योगिक वसाहतींना जोडणाऱ्या मुंबई मेट्रो लाईन ३ च्या कामास गती देण्यात आली असून या प्रकल्पासाठी सन २०१६-१७ मध्ये ९० कोटी ४७ लाख नियतव्यय प्रस्तावित आहे.

५७. लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्याकरीता स्वच्छ, शाश्वत व पर्यावरणपूरक शहरे तयार करण्यासाठी केंद्र शासनाने स्मार्ट सिटी योजना जाहीर केली असून केंद्र शासनाने पहिल्या फेरीत निवडलेल्या २० शहरांमध्ये राज्यातील पुणे व सोलापूर शहरांचा समावेश आहे. तसेच ८ शहरांचे स्मार्ट सिटी प्रकल्प तूर्त राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्याचे शासनाने ठरविले आहे.

५८. राज्यातील अग्निशमन सेवांचे बळकटीकरण व विस्तारीकरणाद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये " महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान " राबविण्यात येत आहे. या प्रयोजनासाठी सन २०१६-१७ करिता ३० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

५९. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कल्याण-डोंबिवली अशा शहरांमध्ये नोकरीसाठी वा स्वयंरोजगारासाठी महिला भगिनींना दररोज बसने प्रवास करावा लागतो. बऱ्याच वेळा गर्दीचा सामना करावा लागतो, रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. त्यांचा हा त्रास कमी व्हावा, त्यांचा दररोजचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी या शहरांमध्ये अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक बस वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून केवळ महिलांसाठी ३०० " तेजस्विनी बसेस " शासनातर्फे देण्यात येत असून यासाठी सन २०१६-१७ मध्ये ५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

आरोग्य

६०. सार्वजनिक आरोग्य विभागास एकूण १ हजार ५५४ कोटी रुपये इतका नियतव्यय राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यापैकी, राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी राज्य व केंद्र हिस्सा मिळून एकूण ९७० कोटी ३७ लाख रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे, शहरी व ग्रामीण भागातील आरोग्य सेवांच्या बांधकामासाठी २३३ कोटी ८० लाख रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे.

६१. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत सर्वसामान्य नागरिकांना उपचारासाठी मदतीचा हात देण्यात आला आहे. या योजनेच्या लाभासाठी सध्या अनुज्ञेय असलेल्या आजारांच्या यादीमध्ये सुधारणा करुन जनतेच्या मागणीप्रमाणे नवीन आजार व उपचारांचा समावेश करण्यात येत आहे. सध्या लाभार्थी घटकांना मिळत असलेले विमा संरक्षण वाढविण्याचेही प्रस्तावित आहे. या योजनेसाठी २०१६-१७ मध्ये ३०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

शिक्षण व क्रीडा

६२. " बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ " ची अंमलबजावणी सर्व शिक्षा अभियान या योजनेमार्फत करण्यात येते. या योजनेसाठी सन २०१६-१७ करिता केंद्र व राज्य हिस्सा मिळून एकूण ७४० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे संगणक प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता केंद्र व राज्य हिस्सा मिळून एकूण १८० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

६३. माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने राज्याच्या भागीदारीने " राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान " सुरु केले आहे. माध्यमिक शाळेमध्ये जाणाऱ्या सर्व मुलामुलींना सन २०१७ पर्यंत जीवनावश्यक व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची ग्वाही या अभियानात देण्यात आली आहे.

या योजनेसाठी सन २०१६-१७ करिता १३७ कोटी ४४ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. मुलींच्या वसतीगृहासाठी केंद्र व राज्य शासन मिळून एकूण ५० कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे.

६४. ग्रंथालय चळवळीचे महत्त्व आमच्या सरकारने नेहमीच अधोरेखित केले आहे. आजच्या संगणक युगाचे सामर्थ्य ओळखून राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये " इ-ग्रंथालयामध्ये " रुपांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार एकूण ४३ ग्रंथालयांचे रुपांतर इ-ग्रंथालयात करण्यासाठी प्रत्येकी ४० लाख याप्रमाणे १७ कोटी २० लाख रुपये इतका खर्च प्रस्तावित आहे.

६५. मिशन ऑलिम्पिक २०२० याद्वारे टोकियो (जपान) येथे सन २०२० मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत राज्यातील खेळाडूंनी जास्तीत जास्त पदके मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याकरिता २०१६-१७ या वर्षासाठी ३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

६६. उच्च दर्जाच्या विविध क्रीडा विषयक सुविधा असलेले विभागीय क्रीडा संकुल, शिंपोली, मुंबई येथे उभारण्यात येत आहे. यासाठी पुरेसे अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येईल.

६७. अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ही संस्था स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असून या संस्थेने संपूर्ण भारतात क्रीडा क्षेत्रात अनेक नामवंत खेळाडू व प्रशिक्षक घडविले आहेत. या संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त राज्य शासनामार्फत सदर संस्थेस १ कोटी रुपये अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येईल.

**सुरक्षा व वाहतूक**

६८. राज्याच्या सुरक्षेची जबाबदारी असणाऱ्या पोलिसांना घरे उपलब्ध होण्यासाठी ३२० कोटी रुपये इतका नियतव्यय उपलब्ध केला आहे. त्याचप्रमाणे राज्यातील महत्त्वाच्या शहरात राबविण्यात येणाऱ्या सीसीटिव्ही प्रकल्पासाठी ३५० कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध केला आहे.

६९. ग्रामीण भागातील वाहतूक व्यवस्थेचा श्वास असलेल्या आणि ग्रामीण जनतेच्या सेवेत अथक कार्यरत असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या कार्याला वेग देण्यासाठी आणि प्रवाशांकरिता विविध सोयी उभारण्याकरिता शासन प्रयत्नशील आहे. त्याअंतर्गत पनवेल, मुंबई, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नांदेड, अकोला व नागपूर या १३ बस स्थानकांमध्ये प्रवाशांसाठी अत्याधुनिक सोयी-सुविधा, प्रवासी बसेसच्या आवागमानासाठी स्वतंत्र संरचना करण्यात येत आहे.

७०. राज्यातील विविध राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व इतर रस्त्यांवर राज्य परिवहन महामंडळाचे सुमारे ३ हजार ५०० निवारे आहेत. संपूर्ण राज्यभरात या सर्व निवाऱ्यांची, अत्याधुनिक सोयी सुविधांसह प्रसाधनगृहांची पुनर्बांधणी प्रस्तावित आहे.

७१. मांडवा येथे रो-रो सेवेच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ६३ कोटी १५ लाख रुपये व लाटरोधक भिंत बांधण्यासाठी ७२ कोटी १४ लाख रुपये अशा एकूण १३५ कोटी २९ लाख रुपये खर्चाच्या प्रकल्पास मंजूरी देण्याचा निर्णय झाला आहे. सन २०१६-१७ मध्ये यासाठी अनुक्रमे ३० कोटी ५१ लाख रुपये व ३६ कोटी रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

**न्यायालयांकरिता पायाभूत सुविधा**

७२. राज्यात विविध ठिकाणी न्यायालयांसाठी इमारती व न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधण्याची योजना राबविण्यात येते. त्यासाठी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरिता राज्य हिस्सा २१३ कोटी ६० लाख रुपये व अपेक्षित केंद्र हिस्सा २७७ कोटी ५० लाख रुपये असे एकूण ४९१ कोटी १० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सार्वजनिक वितरण व्यवस्था**

७३. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार देशातील ग्रामीण भागातील ७५ टक्के व शहरी भागातील ५० टक्के नागरिकांना प्रत्येक महिन्यास अनुदानित दराने धान्य मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. सदर योजनेवर राज्य शासन दरवर्षी सुमारे ४०० कोटी रुपये खर्च करीत आहे.

७४. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत संपूर्ण राज्यात धानासाठी विकेंद्रीत खरेदी योजना राबविण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. विकेंद्रीत धान खरेदी योजनेची अंमलबजावणी हंगाम २०१६-१७ पासून करण्यात येईल. या योजनेसाठी सन २०१६-१७ करिता ६२ कोटी १४ लाख रुपये इतका तरतूद प्रस्तावित आहे.

**वने व पर्यावरण**

७५. गोरेवाडा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय आणि इतर प्रकल्प नियोजित आराखड्याप्रमाणे सुरु आहेत. सदर कामाकरिता सन २०१६-१७ मध्ये ४० कोटी रुपये इतकी तरतूद प्रस्तावित केली आहे.

७६. महाराष्ट्र राज्यात ६ व्याघ्र प्रकल्प असून त्यातील ११० गावांचे पुनर्वसन करावयाचे आहे. आजपर्यंत त्यातील ४५ गावांचे पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरित ६५ गावांच्या पुनर्वसनाचा कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला आहे. यासाठी सन २०१६-१७ मध्ये ६० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

७७. निसर्ग पर्यटनासाठी राज्यातील विविध ठिकाणच्या संरक्षित क्षेत्रात तसेच इतर वनक्षेत्रात विविध सोयी सुविधा निर्माण करण्यात येत असून याकरिता एकूण ४७ कोटी २५ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

७८. राज्यातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन सध्याच्या २० टक्क्यावरुन ३३ टक्क्यापर्यंत वाढविण्याकरिता " हरित महाराष्ट्र " या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी सुरु आहे. दिनांक १ जुलै, २०१६ रोजी " कृषी दिन " व " वन महोत्सवाचे " औचित्य साधून एकाच दिवशी २ कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन आहे.

७९. मध्यभारत व महाराष्ट्रातील महत्त्वाच्या वन प्रशिक्षण केंद्राचे " चंद्रपूर वन प्रशासन, व्यवस्थापन व विकास प्रबोधिनीमध्ये " रुपांतर करण्यात आले आहे. या प्रबोधिनीचा अधिक विस्तार केला जाणार असून त्याकरिता सन २०१६-१७ मध्ये ५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

८०. राज्यामध्ये समुद्रकिनाऱ्यांच्या जवळपास २२६ चौरस किलोमीटर क्षेत्रावर कांदळवन आहे. हे क्षेत्र समुद्र जीवांचे आश्रयस्थान असून जैवविविधतेचे मोठे भांडार येथे उपलब्ध असते. त्यामुळे या क्षेत्राचे संरक्षण आणि संवर्धन अधिक परिणामकारकरित्या करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने " तिवर संवर्धन प्रतिष्ठान " स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. असे प्रतिष्ठान स्थापन करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या प्रतिष्ठानामध्ये जवळपास सुमारे ११५ कोटी रुपये इतका निधी जमा आहे. त्याचा उपयोग करुन तिवर संवर्धन आणि समुद्र किनाऱ्यावरील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि उत्पन्नाची कायमस्वरुपी साधने निर्माण करण्यासाठी या क्षेत्रात खेकडा, कालवा, शिनाने यांचे उत्पादन घेणे शक्य आहे. यासाठी याबाबत संशोधन व विकास करुन या क्षेत्रात असे व्यवसाय व रोजगार वृध्दी करणे शक्य आहे.

८१. महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरच्या श्री विठ्ठलाच्या चरणावर लीन होत लाखो वारकऱ्यांच्या मनात सामाजिक समतेचा अध्यात्मिक वारसा प्रवाहित करणारी चंद्रभागा महाराष्ट्राच्या निखळ, निरागस श्रद्धेचा मानबिंदू आहे. वारकरी आणि चंद्रभागा यांचे अतूट नाते आहे. चंद्रभागेच्या पावित्र्याचे आणि निर्मळतेचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊन " नमामि चंद्रभागा अभियान " शासन व लोकसहभागातून

राबविण्याचा आमचा संकल्प आहे. या अभियानाअंतर्गत चंद्रभागा नदी सन २०२२ पर्यंत निर्मळ, पवित्र व प्रदूषणमुक्त करुन तिचे संवर्धन करण्यात येणार आहे. यासाठी सन २०१६-१७ मध्ये २० कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य

८२. पर्यटन क्षेत्राच्या माध्यमातून तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. पर्यटनाचे महत्त्व ओळखून शासनाने नुकतेच " नवीन पर्यटन धोरण " जाहीर केले आहे. त्यासाठी एकूण २८५ कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे. यानुसार प्रामुख्याने पर्यटन स्थळी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येईल. रायगड, शिवनेरी, सिंधूदुर्ग व इतर किल्ल्यांच्या परिसरात माहिती केंद्र, उपाहारगृह व प्रसाधनगृह इत्यादि सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

८३. औरंगाबाद हा पर्यटन जिल्हा घोषित केला आहे. या जिल्ह्यातील म्हैसमाळ, वेरुळ, खुलताबाद आणि सुलीभंजन या पर्यटन स्थळांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रीत केले जाईल.

८४. महाराष्ट्राला, पर्यटकांना भावणारा सुंदर समुद्र किनारा लाभला आहे. समुद्र किनारी पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत.

८५. नाटक हे महाराष्ट्राचे वेड आहे. नाट्य चळवळीने रुजवलेली संस्कृती हे महाराष्ट्राचे वैभव आहे. या क्षेत्राची जपणूक आणि संवर्धन यासाठी शासन सदैव प्रयत्नशील राहीले आहे. या बांधीलकीला जपत महाराष्ट्र राज्याला देशात वेगळी ओळख देणाऱ्या शासनाच्या राज्य नाट्य महोत्सवांतर्गत घेतल्या जाणाऱ्या हौशी, व्यावसायिक, संगीत, संस्कृत तसेच बालनाट्य स्पर्धेतील पारितोषिकाच्या रकमेत तसेच सादरीकरणासाठी येणारा खर्च व दैनिक प्रवास भत्ता यातील रकमेत वाढ करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

महिला व बालकल्याण

८६. दिनांक १ एप्रिल २०१६ पासून " माझी कन्या भाग्यश्री योजना " राबविण्यात येणार आहे. सदर योजना दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुली तसेच दारिद्र्य रेषेवरील कुटुंबातील मुलींना देखील लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी २५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

८७. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेचा मुलभूत पाया ठरलेल्या अंगणवाड्यांना आधुनिक स्वरुप देणे ही काळाची गरज आहे. त्यांचे " आदर्श अंगणवाडीत " टप्प्याटप्प्याने रुपांतर करण्याची योजना राबविण्याचे शासनाचे धोरण आहे. आदर्श अंगणवाडी कार्यक्रमामुळे लहान मुलांना आनंददायी वातावरणात पूर्वशालेय शिक्षण घेण्याची संधी प्राप्त होईल. यासाठी यावर्षी १० हजार अंगणवाड्या आदर्श करण्याचे निश्चित केले असून, यासाठी १०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

८८. राज्यातील अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस या पूर्व शालेय शिक्षणाचे मूलभूत स्वरुपाचे काम करतात. त्यांना त्यांचे कर्तव्य बजावत असताना सुरक्षितता प्राप्त व्हावी यासाठी त्यांना " प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना " तसेच " प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना " याअंतर्गत समाविष्ट करण्यात येईल. या माध्यमातून २ लाख रुपयापर्यंत जीवन विमा व २ लाख रुपयापर्यंत अपघात विम्याचे संरक्षण प्राप्त होईल. विम्याच्या हप्त्यापोटी लागणारी रक्कम शासनाकडून अदा केली जाईल.

**आदिवासी विकास, सामाजिक न्याय व अल्पसंख्याक विकास**

८९. आदिवासी उपयोजनेतून नामांकित शाळांमध्ये प्रवेशितांसाठी २९० कोटी रुपये, रस्ते विकासाठी ३०० कोटी रुपये, शासकीय आश्रमशाळा बांधकामासाठी ३७० कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध केला आहे. पोषण आहारासाठीच्या " भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम " योजनेसाठी ११२ कोटी ६५ लाख रुपये तरतूद करण्यात आली आहे. या योजनेची व्याप्ती वाढवून आदिवासी क्षेत्रातील सर्व गरोदर माता, स्तनदा माता व ३ ते ६ वयोगटातील बालकांना एक वेळचा सकस आहार देण्यात येत आहे. आदिवासी युवकांसाठी पालघर येथे एकलव्य क्रीडा व उद्योजकता प्रबोधिनी उभारण्यासाठी २५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. आदिवासींच्या जगप्रसिध्द वारली कलेची जोपासना व संवर्धन करण्यासाठी " वारली हट " उभारण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी केंद्र व राज्य निधीतून ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने करण्यासाठी " प्रमाण " ही ऑनलाईन प्रणाली तयार केली असून ती गुढीपाडव्यापासून सुरु करण्यात येत आहे.

९०. संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत अनुदानात दिनांक १ एप्रिल २०१६ पासून वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. निराधार, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता, अपत्यहीन व इतरांना मिळणाऱ्या लाभात वाढ करण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांना २ अपत्ये आहेत त्यांना १ हजार रुपये, १ अपत्य असल्यास ८५० रुपये व अपत्य नसल्यास ७०० रुपये इतके मासिक अर्थसहाय्य दिले जाईल. त्यासाठी ३३२ कोटी रुपये एवढा भार शासन स्विकारणार आहे.

९१. राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी केंद्र व राज्य योजना मिळून एकूण ४०५ कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, तरुणांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण व अल्पसंख्य बहूल भागात पायाभूत सुविधा निर्मिती सारखे उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

९२. ग्रामीण भागामध्ये साधारणत: १ लाख ५५ हजार ९३६ अनुसूचित जातीची कुटुंबे कच्च्या घरात राहतात किंवा बेघर आहेत. अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण भागातील जी कुटुंबे बेघर आहेत किंवा झोपडीमध्ये, कुडाच्या घरात राहतात अशा कुटुंबांना त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या ठिकाणी किंवा भूखंड विकत घेऊन घरकुल बांधून देण्यात येईल. सन २०१९ पर्यंत अनुसूचित जातीचे एकही कुटुंब बेघर राहणार नाही या दृष्टीने शासन प्रयत्न करील. या घरकुल योजनेसाठी ३२० कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे.

९३. " डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना " या नवीन योजनेच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी विहीर खोदण्याकरिता रु. २ लाखापर्यंत अनुदान देण्यात येईल. तसेच विहिरीवर विद्युत पंप बसविणे आणि जेथे ग्रीड मधून वीजपुरवठा शक्य नसेल तेथे सौरऊर्जेतून वीज जोडणी देण्यात येईल. या माध्यमातून त्यांच्या शेतीची उत्पादकता वाढविण्यात मदत होईल.

९४. सन २०१५-१६ हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष असून ते " समता व सामाजिक न्याय वर्ष " म्हणून साजरे करण्यात येत आहे. याअंतर्गत विविध उपक्रम व कार्यक्रमाकरीता सन २०१६-१७ मध्ये १७० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

९५. शैक्षणिक विकासाच्या दृष्टीकोनातून मागासवर्गीय मुलामुलींकरिता शासकीय वसतिगृह बांधण्यासाठी २२० कोटी रुपये इतका नियतव्यय उपलब्ध करुन दिला आहे.

सुशासन ९६. " आपले सरकार " पोर्टलच्या माध्यमातून माहिती संचालनालयाने दिनांक २६ जानेवारी २०१६ पासून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत १५६ सेवा ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याकरिता तांत्रिक सहाय्य केले आहे. उर्वरित सर्व अधिसूचित लोकसेवा २०१६-१७ या आर्थिक वर्षात ऑनलाईन उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी निगडीत पायाभूत सुविधा होस्टिंगसाठी स्टेट डेटा सेंटर तसेच क्षेत्रीय स्तरावरील सर्व शासकीय कार्यालयांना जोडण्यासाठी महाराष्ट्र स्टेट वाईड एरिया नेटवर्कमध्ये सुधारणा व बळकटीकरण करण्याचे नियोजन शासनाने केले आहे. त्यासाठी १० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

९७. प्रगत देशांमध्ये शासनाच्या ध्येयधोरणांसंदर्भात वैचारिक बैठक, शास्त्रशुद्ध विश्लेषण, संशोधन तसेच मूल्यमापन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. याकरिता विशेषज्ञ संस्था कार्यरत असतात. अशा प्रकारची संस्था राज्यात स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. त्यादृष्टीने " यशदा " या राज्य शासनाच्या शिखर प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून जगातील या क्षेत्रातील अग्रगण्य संस्थांच्या सहयोगाने जागतिक मानांकनाची " महाराष्ट्र धोरण संशोधन परिषद " स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे राज्यात योग्य धोरणांची आखणी व मूल्यमापनाची प्रकिया बळकट होईल.

९८. अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना दुर्धर आजार तसेच मृत्यूपश्चात त्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत, " शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीमधून " देण्यात येते. या योजनेमध्ये आता अधिस्वीकृतीधारक पत्रकारांच्या कुटुंबाचाही समावेश करण्यात येत असून या निधीसाठीच्या ५ कोटींच्या मुदत ठेवीमध्ये वाढ करुन ती १० कोटी रुपये करण्यात येत आहे.

स्मारके

९९. महाराष्ट्राचे स्फूर्तीस्थान जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज, त्यांचा पराक्रम आणि त्यांचे रयतेविषयीचे प्रेम याबद्दल फक्त महाराष्ट्रालाच नव्हेतर संपूर्ण देशाला नितांत आदर आहे. त्यामुळे महाराष्ट्राबाहेरही जी जी भूमी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झाली त्या त्या ठिकाणी त्यांची स्मारके उभी राहत आहेत. राज्याबाहेर असे प्रेरणादायी स्मारक उभारण्यात येत असेल तर त्यात राज्य शासनाला आर्थिक व भावनिक सहभाग नोंदविताना अभिमान वाटेल. यासाठी ५ कोटी रुपये नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

१००. लोकमान्य टिळकांनी या देशाला स्वातंत्र्याचा मंत्र दिला. इंग्रजी राजवटीविरुद्ध भारतीयांच्या मनात असंतोष जागविला. भारतीय असंतोषांचे जनक असे लोकमान्य टिळकांना संबोधले गेले. स्वराज्याचा नारा बुलंद करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा प्रसार केला. " स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच " या त्यांच्या सिंहगर्जनेने इंग्रजी राजवट हादरली. त्यांच्या या घोषणेला या वर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने राज्यातील नोंदणीकृत सुमारे ४१ हजार ३२८ सार्वजनिक गणेश मंडळांच्या माध्यमातून लोकमान्यांच्या कार्याविषयी जनजागृती व्हावी याकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमासाठी सन २०१६-१७ मध्ये ५ कोटी रुपये तरतूद प्रस्तावित आहे. तसेच आवश्यकता वाटल्यास जास्तीचा निधी यासाठी उपलब्ध करुन दिला जाईल.

१०१. भारत देश म्हणजे नररत्नांची खाण आहे. यातील गणित विषयातील सर्वोत्तम रत्न म्हणजे गणितशिरोमणी, गणितसूर्य भास्कराचार्य द्वितीय हे आहेत. महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगेत वसलेल्या विज्जलवीडची अर्थात आजच्या चाळीसगाव तालुक्यातील पाटणदेवीची भूमी भास्कराचार्यांच्या वास्तव्याने पुनीत झाली आहे. त्यांच्या स्मरणार्थ जागतिक दर्जाची " भास्कराचार्य गणित नगरी " तयार करण्याचा आमचा संकल्प आहे.

१०२. जिल्हा परिषद ते उपमुख्यमंत्री पदापर्यंत राजकीय वाटचाल करणारे एक प्रामाणिक व उमदे नेतृत्व म्हणजे दिवंगत आर. आर. (आबा) पाटील. राज्याचे गृहमंत्री या नात्याने त्यांनी स्वत:हून गडचिरोली या नक्षलग्रस्त जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारले. राजकारण आणि नितीमत्तेची सांगड घालणाऱ्या या दिवंगत नेत्याच्या स्मरणार्थ सांगली जिल्ह्यात त्यांच्या नावे एक भव्य असे सभागृह बांधण्यात येईल. याकरिता ५ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येतील.

१०३. आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने सिंधुदूर्ग नगरी ओरोस येथे पत्रकार भवन उभारण्याकरिता आवश्यक आर्थिक सहाय्य शासनामार्फत उपलब्ध करुन दिले जाईल.

**मराठी भाषा संवर्धन**

१०४. " दुर्मिळ मराठी ग्रंथांचे संगणकीकरण " या उपक्रमांतर्गत फेब्रुवारी २०१६ पर्यंत ९५ पुस्तके व विविध नियतकालिकांचे २५३ सुटे अंक संगणकीकृत करुन संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**स्थूल आर्थिक आढावा व राज्याचे उत्पन्न**

१०५. केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार, यांनी मागील वर्षी राष्ट्रीय लेखे संकलनाचे पायाभूत वर्ष २००४-०५ वरुन २०११-१२ असे सुधारित केले आहे. यामध्ये वापरण्यात येणाऱ्या व्याख्यांमध्येही बदल करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने क्षेत्रनिहाय अंदाज हे " मूळ किंमतींनुसार स्थूल मूल्यवृध्दी " असे सादर करण्यात येतील व देशांतर्गत स्थूल उत्पन्न हे " बाजार किंमतींनुसार स्थूल उत्पन्न " असे संबोधण्यात येईल. क्षेत्रनिहाय अंदाज हे " घटक खर्चावर आधारित स्थूल उत्पन्न " याप्रमाणे परिगणित करण्यात येणार नाही. राज्याने यावर्षी नवीन पध्दतीचा वापर करुन राज्य उत्पन्नाचे अंदाज परिगणित केले आहेत. सुशासन व प्रगत आर्थिक धोरणांची आमच्या शासनाने हिरिरीने अंमलबजावणी केल्याने सन २०१४-१५ मध्ये कुंठीत असलेला स्थूल राज्य उत्पादनाचा वृध्दी दर ५.८ टक्के हा गतीमान होऊन सन २०१५-१६ मध्ये कृषी विकास दर उणे असूनसुध्दा ८ टक्के झालेला आहे ही अत्यंत समाधानाची बाब आहे. पावसाची कृपा झाली असती तर आपण नक्कीच द्विअंकी विकास दर गाठला असता. महाराष्ट्राच्या तुलनेत गुजरात, उत्तर प्रदेश व राजस्थान यांचा विकास दर बराच कमी आहे.

१०६. प्रचलित किंमतीनुसार २०१४-१५ मध्ये राज्याचे नाममात्र निव्वळ उत्पन्न १५ लाख ७२ हजार ३७ कोटी रुपये आहे. महाराष्ट्राचे अंदाजित दरडोई उत्पन्न सन २०१४-१५ मध्ये १ लाख ३४ हजार ८१ रुपये इतके आहे, तर अंदाजित दरडोई राष्ट्रीय उत्पन्न ८६ हजार ८७९ रुपये इतके आहे.

**वार्षिक योजना सन २०१६-१७**

१०७. राज्याच्या वार्षिक योजनेचे सन २०१६-१७ चे आकारमान ५६ हजार ९९७ कोटी रुपये इतके प्रस्तावित करण्यात आले आहे. या आकारमानात सन २०११ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जाती उपयोजनेसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ११.८ टक्के आणि आदिवासी उपयोजनेसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार ९.४ टक्के याप्रमाणे अनुक्रमे ६ हजार ७२५ कोटी ६४ लाख रुपये व ५ हजार ३५७ कोटी ७१ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे. जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी ७ हजार ५६२ कोटी २ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आलेला आहे.

**राज्याची वित्तीय स्थिती**

१०८. मार्च २०१५ मध्ये अर्थसंकल्प सादर केला असताना १ लाख ९८ हजार २३० कोटी रुपये महसूली जमा अपेक्षित केली होती. वर्षभरातील महसूल संकलनाचा कल पाहता सुधारित अंदाज १ लाख ९८ हजार ३२० कोटी रुपये एवढा निश्चित केला आहे. वर्षाच्या सुरुवातीस महसूली खर्च २ लाख १ हजार ९८८ कोटी रुपये इतका अपेक्षित होता. सुधारित अंदाजात हा खर्च २ लाख ७ हजार ६११ कोटी रुपये इतका निश्चित केला आहे. परिणामी, वर्षाच्या सुरुवातीस अपेक्षित ३ हजार ७५७ कोटी रुपये महसूली तूट वाढून ती ९ हजार २८९ कोटी रुपये इतकी झालेली आहे. तुटीत ही वाढ प्रामुख्याने दुष्काळामुळे शेतकऱ्यांना दिलेल्या मदतीमुळे झाली आहे. सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पामध्ये महसूली जमा २ लाख २० हजार ८१० कोटी रुपये व महसूली खर्च २ लाख २४ हजार ४५४ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी, ३ हजार ६४४ कोटी रुपये महसूली तूट येत आहे. अनावश्यक

खर्चात बचत करुन व महसूल वसुली अधिक प्रभावीपणे करुन ही तूट मर्यादित करण्याचा प्रयत्न मी करेन. या राज्याच्या विकासाचा संकल्प करताना जे उद्दिष्ट आम्ही निश्चित केले आहे, त्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करु, अशी ग्वाही या पवित्र सभागृहाच्या साक्षीने राज्यातील जनतेला देत आहे.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग २ कडे वळतो.